# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZEETE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

**PART TWO**


**(असाधारण)**

शुक्रवार, दिनांक १३ एप्रिल, २०१८

**अधिसूचना**

क्र. - ३०/२०१८ दिनांक - १३.४.२०१८

**विषय : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ...... अधिष्ठाता तदर्थ नामनिर्देशन आणि अंतरिम अधिष्ठाता मंडळाबाबत.**

मा.कुलगुरूंनी विद्यापीठ पत्र क्र. SGBAU/1/121/A-96/2018 दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी, मा.कुलपती कार्यालयाला विद्यापीठाचे शैक्षणिक कामकाज सुचारू होण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १४६ मधील तरतूद (४) व (५) अंतर्गत अंतरिम अधिष्ठाता मंडळ गठीत करण्याला तसेच अधिष्ठात्यांचे तदर्थ नामनिर्देशनाला मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव सादर केला होता. मा.कुलपतीनी, कुलपती कार्यालय पत्र क्र. CS/SGBAU/2018/CR-055/593 दिनांक १२.४.२०१८ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १४६(४) च्या तरतूदीचा वापर करून मा.कुलगुरूंनी सादर केलेल्या प्रस्तावाला तसेच कलम १४६(५) अंतर्गत अंतरिम अधिष्ठाता मंडळ गठीत करण्याला मान्यता प्रदान केली आहे.

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३४(२) नुसार खालीलप्रमाणे असलेल्या विद्याशाखांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सदर विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून तदर्थ नामनिर्देशन करण्यात आले आहे. हे नामनिर्देशन नविन अधिष्ठात्यांची नियुक्ती होईपर्यंत किंवा आजपासून एक वर्षापर्यंत यापैकी जे आधी घडेल अश्या कालावधीसाठी करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

| | |
|---|---|
| 1) Faculty of Science & Technology | : Dr.Prin. F.C.Raghuwanshi |
| 2) Faculty of Commerce & Management | : Dr.Prin. D.W.Nichit |
| 3) Faculty of Humanities | : Dr. Prin. Sau. S.R.Deshmukh |
| 4) Faculty of Inter-Disciplinary Studies | : Dr. Sau. M.P.Kale |

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता याद्वारे पुनःश्च अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३६(२) नुसार अंतरिम अधिष्ठाता मंडळ गठीत करण्यात आले आहे. सदर प्राधिकरणाची मुदत ते गठीत केल्यापासून एक वर्ष कालावधीकरिता किंवा सदर प्राधिकरण यथोचितरित्या गठीत होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत असेल.

स्वा./-
(डॉ.अजय प्र. देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****